सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : एडीआर-३४२१/प्र.क्र.५६४/२०२४/ जाहिरात दिनांक : २० ऑगस्ट, २०२४

# -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :- महाराष्ट्र कृषि सेवेतील गट-अ, गट-ब व गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील पदांच्या मागणीपत्रांबाबत**

महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ व गट-ब संवर्गातील एकूण २५८ पदांचे मागणीपत्र आयोगास दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजी शासनाकडून प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या परीक्षा योजनेनुसार महाराष्ट्र कृषि सेवेतील पदे महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त परीक्षेतून भरण्यात येणार असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि, सदर परीक्षेसंदर्भात दिनांक २९ डिसेंबर, २०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध होईपर्यंत आयोगाकडे महाराष्ट्र कृषि सेवा परीक्षा २०२४ साठी मागणीपत्र शासनाकडून प्राप्त झाले नसल्याने, सदर कृषि सेवेतील पदांचा समावेश जाहिरातीमध्ये करणे शक्य झाले नाही.

२. महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा – २०२४, दिनांक २५ ऑगस्ट, २०२४ रोजी घेण्यात येत असून सद्यस्थितीत प्रस्तुत परीक्षेशी संबंधित सर्व पूर्व तयारी झालेली आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये कृषि सेवेतील पदांचा समावेश करणे शक्य नसल्याने महाराष्ट्र कृषि सेवेतील प्राप्त मागणीपत्रातील पदांच्या भरतीप्रक्रियेबाबत पुढील नियोजन लवकरात लवकर करण्यात येईल.

उपसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : नवी मुंबई